**गैरअर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करते की,**

**नाव –** अंजली विष्णू केसरकर.

**वय** - ५३ वर्ष, **हुद्दा** - श्रेणी पो.उ.नि.

**नेम.-** महिला सहाय्यता कक्ष, कोल्हापूर.

**गैरअर्जदारतर्फे सरतपास श्री. एस. पी. पोवार, यांच्यामार्फत.**

१. मी महिला सहाय्यता कक्ष कोल्हापूर येथे पोलीस उपनिरिक्षक पदावर सन २०२० पासून कार्यरत आहे. मला आज साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळाले असून मी मागणी केलेली कागदपत्रे सोबत आणलेली आहेत. त्याप्रमाणे अर्जदार प्रमोद याने महिला समितीकडे दि.२८.०८.२०२३ रोजी अर्ज केला होता. आता मला त्याची न्यायालयात दाखल केलेली प्रमाणित प्रत दाखवली. ती बरोबर आहे तिला नि.क्र. २६ देण्यात आलेला आहे. त्याने त्याची पत्नी नांदायला येत नसून तिला नांदण्यास आणण्याबाबत अर्ज दिला होता.

२. मी दि.१२.०९.२०२३ रोजी अर्जदार प्रमोद व त्याची पत्नी काजल हिचे जबाब नोंदवले होते. आता मला त्या जबाबाची सत्य प्रत दाखवली ती मी सोबत आणलेलया मुळ प्रती प्रमाणे बरोबर आहे. सदरचा जबाब मी नोंदवून घेतलेला आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावरती काजलची स्वाक्षरी आहे. साक्षीदाराने आणलेल्या मुळ प्रती सोबत वस्तू क्र. अ वरील जबाब पडताळला असता तो बरोबर असल्यामुळे त्याला **नि.क्र. ३२** देण्यात येतो. मी दोघांना समज दिली असता गैरअर्जदार काजल तिचे अर्जदारासोबत विचार पटत नसल्यामुळे नांदण्यास तयार नव्हती.

**सरतपास पुर्ण.**

**अर्जदारातर्फे उलटतपास – श्री. जी. जे. पाटील, वकील यांच्यामार्फत.**

३. प्रमोद याने टपालामार्फत अर्ज पाठवला होता. तो दि. २८.०८.२०२३ रोजी आमच्या कार्यालयाला मिळाला होता. अर्ज प्राप्त झाल्यानंतर मी प्रमोदला दि.२८.०८.२०२३ रोजी फोन केला होता. त्याने फोन उचलला नव्हता. त्यानंतर मी दि.०१.०९.२०२३ रोजी गैरअर्जदार काजलला फोन केला होता. मी प्रमोद व काजल यांना दि. ०४.०९.२०२३ रोजी फोन करून हजर रहाण्याचे कळवले होते. दि. ०४.०९.२०२३ रोजी दोघेही हजर नव्हते. दि. ०७.०९.२०२३ रोजी गैरअर्जदार काजल ही हजर झाली होती. त्यादिवशी अर्जदार प्रमोदला

फोन केला असता तो आजारी असल्यामुळे त्याने दि.०९.०९.२०२३ रोजी बरे वाटल्यास फोन करतो असे कळवले होते. त्याप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार दि.१२.०९.२०२३ रोजी हजर झाल्यांनतर मी त्यांचे जबाब घेतले होते. मी त्याबाबतचे फोन रेकॉर्ड न्यायालयात हजर केले नाहीत.

४. मी दि.१२.०९.२०२३ रोजी जबाब घेताना प्रमोद व काजल यांच्याकडे त्यांच्यातील न्यायालयात प्रलंबित असलेलया प्रकरणांची कागदपत्रे मागितली नव्हती. आम्ही मागणी केलेली नसल्यामुळे त्यांनी कोणतीही कागदपत्रे दिलेली नव्हती. अर्जदार व गैरअर्जदार दि.१२.०९. २०२३ रोजी हजर झाल्यानंतर त्याच दिवशी अर्ज निकाली काढण्यात आला होता. अर्जदार प्रमोद याने त्याचा अर्ज निकाली काढण्याबाबत मागणी केली होती. मी दोघांचे जबाब नोंदवून प्रमोदच्या अर्जाप्रमाणे मुळ अर्ज निकाली काढला आहे.

५. काजलने तिच्या जबाबात प्रमोद व त्याच्या नातेवाईकां कडून त्रास होत असल्यामुळे नांदण्यास नकार देवून त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करणार असल्याचा जबाब दिला होता. प्रमोद व काजल यांनी माझ्या समक्ष चर्चा केली नव्हती. ते दोघे चर्चा करून आल्यावर मी काजलकडे चौकशी केली असता तीने प्रमोदसोबत विचार जुळत नसल्यामुळे नांदायचे नाही असे सांगितले होते. प्रमोदकडे चौकशी केली असता त्याने काजलला कधीही नांदवावयास तयार असल्याचे सांगितले होते. मी दोघांचे समुपदेशन करून त्यांना एकत्र राहण्याबाबत वेगवेगळे पर्याय सुचवले होते. मी सदर प्रकरणामध्ये माझा स्वतंत्र अहवाल दिलेला नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र. ३२ वरील काजलचा जबाब तिच्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी काजल व प्रमोद यांचे समुपदेशन केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रमोद व काजल यांना कोणताही वेळ न देता प्रमोदच्या मागणीप्रमाणे तातडीने प्रकरण निकाली काढले.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

दिनांक – २७.०२.२०२६.

आजरा.